# अस्पृश्योद्धार चळवळीत विदर्भाचे योगदान

झोड अनिल झोड
कमल नेहरु महाविद्यालय, नागपूर
मो.नं. 7756901637

आर्यांनी अनार्यांना युद्धात पराभूत केले व त्यांना आपले दास बनविले तेच पूढे शुद्र म्हणून ओळखल्या जाऊ लागले. (षुद्र) ह्यांच्या कडे समाजातील तिन्ही वर्णीयांची सेवा करणे हे कार्य सोपविण्यात आले. कालांतराने हलकी कामे करणारे शुद्र म्हणून ओळखल्या जाऊ लगले व पूढे शुद्र हेच अस्पृष्य समजण्यात येत. शुद्रांना मंदिरात प्रवेष करण्यास, षिक्षण घेण्यास, राजकीय व सामाजिक कार्यात भाग घेण्यास, उच्च प्रतीचे वस्त्र वापरण्यास, घोड्यावर बसण्यास, अलंकार वापऱ्यास पक्क्या विटांनी बांधलेल्या घरांमध्ये राहण्यास मनायी होती. त्यांना मातीच्या भांड्यामध्ये अन्न षिजवावे लागे.

पेषवे काळात अस्पृष्यांना पाठीला खराटा बांधावा लागे व गळ्यात मडके थुंकण्यासाठी बांधावे लागे. पेषवे काळात अस्पृष्यांना कोणतेच अधिकार नव्हते त्यामुळे त्यांची स्थिती अत्यंत वाईट होती. ब्रिटिष काळात प्रारंभी उच्चवर्णीयांचा आपल्या सत्तेला विरोध होईल म्हणून ब्रिटिषांनी प्रषासनात अस्पृष्यांना दूर ठेवले. पूढे ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा व या धर्माचा स्विकार करावा म्हणून धर्मोपदेषांकांनी अस्पृष्यांना षिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या व आरोग्याच्या सोयी पुरविल्या व प्रषासनात त्यांना नोकऱ्या देऊ करून त्यांना धर्मपरिवर्तन करण्यास प्रलोभन दिले.

अस्पृष्यांमध्ये समाजजागृती घडवून आणण्याचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी षिंदे, कोल्हापूरचे शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी कार्य केले. ज्योतिबाफुल्यांनी अस्पृष्यांच्या मुलांना षिक्षण घेण्यासाठी शाळा काढली. अस्पृष्यांना सायंकालीन शाळेत षिक्षण घेता यावे यासाठी रात्रकालीन शाळा स्थापन करण्यात आल्या. विदर्भात अस्पृष्यता निवारण्याचे कार्य संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अनसूयाबाई काळे, बॅरिस्टर अभ्यंकर, जमनालाल बजाज, डॉ. ना.भा.खरे विद्यावती देवडिया, कालीचरण नंदागवळी, रावसाहेब ठवरे, नानासाहेब गवई यांनी देखील केले. सर्व जाती धर्माच्या लोकांकरीता मंदिरे खुली असली पाहिजे. देवळातील देवावर विषिष्ट जातीच्या लोकांचा हक्क नाही. मंदिरे ही

खाजगी मालमत्ता नाही त्यामुळे हरिजनांना मंदिरात प्रवेष घ्यावा, त्यांनी समाजातील इतर वर्गीयांना अस्पृष्याता विहिरी, तलाव पाणवठे, येथे पाणी भरण्यास व मंदिरात प्रवेष करण्यास मनायी करू नये असे जाहीर केले.

ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर वर्तमान पत्रात दलितांचे प्रष्न प्राधान्याने मांडल्या जात नसल्याने गोपाळ बुवा वलंगकर यांनी दिनबंधू व सुधारक या वृत्तपत्रात लिखान करून दलितांच्या प्रष्नांना वाचा फोडली, किसन फागुजी बनसोड यांनी निराश्रित नागरिक, चोखामेळा, मजूरपत्रिका विटाळ विध्वंस ही वृत्तपत्रे काही वर्षे चालविली व समाज जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

महात्मा गांधी यांनी अस्पृष्योद्धाराच्या कार्यासाठी हरिजन नावाचे वृत्तपत्र काढले. हिंदू धर्मात अस्पृष्यतेरूपी राक्षस, षिरल्याने आपला अधःपात झाला. अस्पृष्यता ही हिंदू धर्मात घाण आहे. तिच निवारण करणे प्रत्येक हिंदूचे कार्य आहे. हिंदूनी दलित व मागासलेल्या जातीची सेवा करण्या करण्यासाठी त्यांनी अखिल भारतीय, अस्पृष्यता निवारण संघाची स्थापना केली. महात्मा गांधीनी अस्पृष्यता निवारण संघाची स्थापना केली. महात्मा गांधींनी अस्पृष्य वर्गाला हरिजन असे संबोधले व हरिजनांच्या उद्धारासाठी संपूर्ण भारतात 184 शाखा स्थापन केल्या. वऱ्हाड प्रांतिक हरिजन सेवक संघाच्या अध्यक्ष श्रीमती दुर्गाताई जोषी होत्या. त्या महात्मा गांधींनी अस्पृष्योद्धाराचा कार्यक्रम विविध वृत्तपत्रात जाहीर केला 6 नोव्हे. 1933 पासून 21 नोव्हे 1933 पर्यत विदर्भातील सेलु, वर्धा, नागपूर, सावनेर, काटोल, भंडारा, तुमसर, चंद्रपूर, हिंगणघाट, धामणगांव, चांदूर, अकोला, खामगाव, लोणी, अकोट, अमरावती, बडनेरा, चिखलदरा इत्यादी गावांना भेटी दिल्या. तेथील सभामध्ये त्यांनी अस्पृष्यता निवारण्यासाठी जनतेला मार्गदर्षन केले. त्यांनी सभामध्ये सांगितले की अस्पृष्यांना आपल्या बहिणी प्रमाणे आपल्या घरात, शाळात व मंदिरात प्रवेष करू द्यावा. इतरांप्रमाणे ती ईष्वराची लेकरे आहेत ही भावना त्यांच्यात जागृत केली पाहिजे. महात्मा गांधींनी अस्पृष्यांसाठी देवालये, विहिरी धर्मषाळा इत्यादी खुले करण्याचे आवाहन केले. प्रत्येक सभेत महात्मा गांधीना हरिजन कार्यासाठी निधी देण्यात आला आहे. महिलांनी सुवर्णाच्या बांगड्या, चांदीची भांडी, अलंकार दिले त्या सर्वाचा सभेत लिलाव केल्या जात व प्राप्त झालेली रक्कम हरिजन निवारण फंडात जमा करण्यात येत. अस्पृष्येतचा नाष झाला नाही तर हिंदू धर्माचा निष्चितच नाष

होईल. महात्मा गांधी म्हणजे अस्पृष्य मागासलेले नाहीत. त्यांना षिक्षण दिले तर ते आपल्याप्रमाणे कोणतेही कार्य करू शकतात. हरिजन कार्यासाठी वऱ्हाडात महात्मा गांधींना 32000 हजार रुपयाचा निधी प्राप्त झाला.

अस्पृष्यता निवारण्यासाठी ठिक–ठिकाणी सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला यामुळे स्पृष्य–अस्पृष्य असा भेदभाव नष्ट होऊ शकतो तर आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिल्यास जातीभेद नष्ट होऊ शकतो. महात्मा गांधींनी सुरू केलेल्या चळवळीमुळे अस्पृष्यांना चांगली वागणूक देण्यात येऊ लागली अस्पृष्यांसाठी अंबादेवीचे मंदिर, वर्धा येथील लक्ष्मीनारायण मंदिर, भंडारा येथील खामतलावा जवळचे षिवमंदीर, सेलु येथील बालाजी मंदिर, रामटेक येथील श्रीरामाचे मंदिर अस्पृष्यांना दर्षनासाठी मोकळी करून दिली. तसेच सार्वजनिक विहरिंचे पाणी भरण्यास परवाणगी देण्यात आली. स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी जातीभेद न पाळता खाद्याला खांदा लवून स्पृष्य. अस्पृष्य कार्य करू लागले. षिक्षण संस्था मध्ये अस्पृष्यांना प्रवेष देण्यात येऊ लागला. अस्पृष्योद्धाच्या चळवळी मुळे जातीभेदाची तीव्रता कमी झाली. परस्पर सहकर्य वाढीस लागले.

## संदर्भ ग्रंथ सूची


1) डॉ. आंबेडकर बी. आर. अस्पृष्य मूळचे कोण – सुगत प्रकाषन, नागपूर
2) डॉ. आंबेडकर बी.आर. जातीसंस्थेचे उच्चाटन मनोविकास, प्रकाषन मुंबई
3) डोंगरे कृष्णकांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान. बहुजन साहित्य प्रसार केंद्र.
4) गवई पी.ए. पेषवेकालीन समाज व जातीय संघर्ष प्रचार प्रकाषन कोल्हापूर.
5) षिंदे विठ्ठल रामजी भारतीय अस्पृष्यांचा प्रष्न,समाजकल्याण प्रकाषन, मुंबई
6) ताटके अरविंद महात्मा गांधी, सरिता प्रकाषन.
7) उदासी अकोला दैनिक मुद्रिका स्वातंत्र्य संग्राम विषेषांक 1989.
8) शेंडे ना.रा. कै. ठवरे चरित्र व चारित्र्य, प्रकाषक युगांतर षिक्षण संस्था, नागपूर 1968.
9) कोसारे एच.एल. विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास.
10) कडवे रघुनाथ मानवतेचे पुजारी राष्ट्रसंत तुकोडोजी महाराज संस्कार प्रकाषन, नागपूर.